नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १० Issue - 10 | वार मंगळवार दि. २७ मे २०२५ Blow- Tuesday Date 27 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात मान्सूनची तुफानी एन्ट्री

## रस्ते, रेल्वे वाहतूक विस्कळीत, मुंबईत पहिल्याच पावसात दाणादाण; जनजीवन विस्कळीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यासह आता मुंबईत देखील मान्सून दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाकडून याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. तसेच मान्सूनने मुंबईत दाखल होण्याचा रेकॉर्ड देखील मोडला आहे.

सरासरी मान्सून मुंबईत दाखल होण्याची तारीख ११ जून आहे. यंदा मान्सून १६ दिवस आधीच मुंबईत दाखल झाला आहे. यंदा पहिल्यांदाच मान्सून लवकर धडकला. मान्सूनने मुंबई दाखल होण्याचा रेकॉर्ड मोडला. मान्सून याआधी १९५६, १९६२ आणि १९७१ मध्ये २९ मे रोजी मुंबईत दाखल झाला होता. मात्र, यंदा पहिल्यांदाच मान्सून मुंबईत लवकर धडकला आहे. मान्सून २६ मे रोजी मुंबई दाखल झाल्याची घोषणा भारतीय हवामान विभागाने केली आहे.



मुंबई आणि उपनगरातील पावसाचा लोकल आणि एक्स्प्रेस गाड्यांवर परिणाम झाला आहे. ठाणे ते सीएसएमटीकडे जाणारी जलद वाहतूक ४० मिनिटं उशिराने सुरु आहे. ठाणे ते कल्याण जलद आणि धिमी वाहतूक १५ मिनिटं उशिराने सुरु आहे. ठाणे रेल्वे स्थानकात काही इंडिकेटर बंद झाल्याने प्रवाशांची तारांबळ उडाली. तर काही काळ ठप्प झालेली हार्बर मार्गावरील सेवा पूर्ववत झाली आहे. मात्र वाहतूक उशिराने सुरु आहे. याशिवाय सीएसएमटी स्थानकात एक्स्प्रेस ट्रेनच्या ट्रॅकवर पाणी आल्याने काही गाड्यांची वेळ बदलण्यात आलीय. सीएसएमटी-हिंगोली जनशताब्दी गाडी दुपारी १ वाजून ५० मिनिटांनी रवाना होणार आहे. तर सीएसएमटी-धुळे एक्सप्रेसही १ वाजून ४० मिनिटांनी रवाना होणार आहे. तसेच पश्चिम द्रुतगती मार्गावर देखील मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी झाल्याचं पाहायला मिळत आहे.

मुसळधार पावसाने आचार्य अत्रे चौक स्थानकानजीकची एक संरक्षक भींत कोसळल्याने भुयारी स्थानकात पाणी शिरल्याची घटना घडली आहे. मात्र एक बाब लक्षात घेतली पाहिजे, या स्थानकाचे अद्याप काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे जेथून हे पाणी शिरले तो मार्ग आगमन वा प्रस्थानासाठी वापरण्यात येत नव्हता. तेथे कायमस्वरुपी काम अद्याप पूर्ण झालेले नाही. (हे कायमस्वरुपी काम येत्या (पान २ वर...)

# मार्च २०२६ पूर्वी संपूर्ण देश नक्षलमुक्त करणार



## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नांदेडच्या शंखनाद सभेतून ग्वाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदेड : 'ऑपरेशन सिंदूर' कारवाईतून भारताने आपली क्षमता आणि ताकद जगासमोर सिद्ध केली असून भारताकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांची गय केली जाणार नाही असा स्पष्ट इशारा मोदी सरकारने केवळ पाकिस्तानलाच नव्हे, तर जगाला दिला आहे. आता देशातील नक्षलवाद्यांचे अड्डेही उद्ध्वस्त करण्यात येत असून ३१ मार्च २०२६ या तारखेपूर्वी या देशाच्या भूमिवरून नक्षलवादाचा नायनाट झालेला असेल, या संकल्पाचा पुनरुच्चार आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी नांदेड येथील प्रचंड शंखनाद सभेत बोलताना केला.

गेल्या २२ एप्रिलला पहलगाममध्ये पाक प्रशिक्षित अतिरेक्यांनी आपल्या निष्पाप पर्यटकांची भ्याड हत्या केली, तेव्हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना धूळ चारण्याचा इशारा दिला होता. १० वर्षांपूर्वीची काँग्रेसची सत्ता संपली आहे, आता मोदी सरकार आहे, याचा पाकिस्तानला विसार पडला. पहलगाम हल्ल्यानंतरच्या ऑपरेशन सिंदूर कारवाईत पाकिस्तानात घुसून शेकडो पाकिस्तानी अतिरेक्यांना ठार करून केवळ पाकिस्तानलाच नव्हे, तर संपूर्ण जगाला एक संदेश दिला गेला आहे. भारताच्या जनतेवर, सीमेवर हल्ला झाला तर 'गोली का जवाब गोले से दिया जायेगा', हा संदेश देऊन ७ मे रोजी २२ मिनिटांत अतिरेक्यांचे नऊ अड्डे उद्ध्वस्त करण्याचे काम भारतीय सेनेने केले. ८ मे रोजी पाकिस्तानने ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचे हल्ले केले, पण आपल्या सक्षम सुरक्षा व्यवस्थेने एकही क्षेपणास्त्र किंवा ड्रोन भारताच्या भूमीवर घुसू न देता हवेतच त्यांची वासलात लावली. ९ तारखेला पाकिस्तानच्या एअर डिफेन्स सिस्टीम आणि हवाई तळांवर हल्ले करून आमच्या सेनेने त्यांची पूर्णपणे वाताहत केली, आणि आमच्या माताभगिनींच्या कपाळावरचे 'सिंदूर' स्वस्त नाही, याची जाणीव जगाला करून दिली. हा नवा भारत असून विकसित आणि बलवान भारताकडे कोणाचीही वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमतही होणार नाही, हे मोदी सरकारने सिद्ध करून दाखविले. रक्त आणि पाणी एकत्र वाहणार नाही, व्यापार आणि दहशतवादही एकत्र चालणार नाही, हे मोदी यांनी बजावले आहे. यापुढे अशी आगळीक केलीच तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही मोदी यांनी दिला आहे. पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर आणण्यासाठी सर्वपक्षीय नेते जगाच्या वेगवेगळ्या देशांत जात असताना, उद्धव ठाकरेंच्या पक्षाच्या एका नेत्याने गळे काढण्यास सुरुवात केली, पण जर बाळासाहेब असते, तर ऑपरेशन सिंदूरच्या यशस्वी कारवाईबद्दल त्यांनी मोदीजींना मिठी मारली असती, अशा शब्दांत श्री. शाह यांनी ठाकरे यांच्या पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत यांचा नामोल्लेखही न करता टीका केली. या सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळात त्यांच्या पक्षाचेही प्रतिनिधी आहेत, पण उद्धव सेना त्याची वरात म्हणून संभावना करते, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आपल्या भाषणात शाह यांनी फडणवीस सरकारने मराठवाड्यात सुरू केलेल्या पाणी योजनांचा संपूर्ण तपशील मांडला. ठाकरे सरकारने त्यामध्ये अडथळे आणले, पण आता पुन्हा देवेंद्र फडणवीस सरकारने या सर्व प्रकल्पांना गती दिली असून मराठवाड्याच्या प्रत्येक घरात, शेतात पाणी पोहोचेल अशी व्यवस्था केली आहे, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची जुनी मागणी असतानाही शरद पवार यांच्यासारख्या दीर्घकाळ केंद्रीय मंत्री राहिलेल्या नेत्याने काहीच केले नाही, ते काम मोदीजींनी केले, असे ते म्हणाले.


# नागरिकांच्या मदतीसाठी प्रशासनाने सतर्क-सज्ज रहावे, नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश; राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, : पावसाने निर्माण झालेल्या परिस्थितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्यपूर्णरित्या आढावा घेत आहेत. या परिस्थितीत नागरिकांना मदत करण्यासाठी संपूर्ण प्रशासनाला अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. ज्या ठिकाणी नुकसान झाले तेथे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. राज्याच्या मुख्य सचिव आणि राज्याच्या आपत्ती निवारण कक्षाशी ते सातत्याने संपर्कात आहेत.

दरम्यान, राज्यातील या परिस्थितीबाबत मुख्यमंत्र्यांना विविध यंत्रणांकडून अवगत करण्यात आले. राज्यात पुणे, सातारा, सोलापूर, रायगड, मुंबई आणि 'एमएमआर' या भागात अतिवृष्टी झालेली आहे. दौंडमध्ये ११७ मि.मी., बारामतीत १०४.७५ मि.मी., इंदापुरात ६३.२५ मि.मी. इतका पाऊस झाला आहे. बारामतीत २५ घरांची अंशत: पडझड झाली असून, पुरात अडकलेल्या ७ जणांना वाचविण्यात आले आहे. ७० ते ८० कुटुंबांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. मोबाईल सेवा काल विस्कळित झाल्या होत्या. त्या आता पूर्ववत होत आहेत. इंदापूर येथे २ जणांना पूरस्थितीतून बाहेर काढण्यात आले आहे. फलटणमध्ये १६३.५ मि.मी. इतका पाऊस झाला.



'एनडीआरएफ'चा एक चमू फलटणमध्ये आहे. ३० नागरिक दुधेबावी गावाशेजारी अडकले होते. त्यांना निवास आणि भोजनाची सुविधा पुरविण्यात आली आहे.

सोलापूरमध्ये ६७.७५ मि.मी. पाऊस झाला. माळशिरस तालुक्यात ६ नागरिक पुरात अडकले होते, त्यांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. पंढरपूर येथे भीमा नदी पात्रात ३ जण अडकले, त्यांचे बचावकार्य सुरु आहे. रायगडमध्ये एकाचा वीज पडून मृत्यू झाला, तर महाड ते रायगड किल्ला रस्ता अतिवृष्टीमुळे बंद करण्यात आला आहे.

मुंबईत २४ तासात १३५.४ मि.मी. इतक्या पावसाची नोंद झाली आहे. मुंबईत एकूण ६ ठिकाणी पाणी साचण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. एकूण १८ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या घटना घडल्याच्या तर ५ ठिकाणी इमारतीच्या भींती पडण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. मुंबई महापालिका, अग्निशमन दल, मुंबई पोलिस आणि इतरही सर्व यंत्रणा सज्ज आहेत. कुठेही प्राणहानी झालेली नाही. मुंबईत ५ ठिकाणी 'एनडीआरएफ' टीम कुठल्याही प्रकारच्या मदतीसाठी सज्ज आहेत.

दरम्यान, मुंबईत पुढील २४ तास विजांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राज्याच्या मुख्य सचिव तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध यंत्रणांना सतर्क आणि सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. एनडीआरएफ - एसडीआरएफ, अग्निशमन, महसूल प्रशासन तसेच गृह विभाग आदींना नियंत्रण कक्षांच्या माध्यमातून तातडीच्या उपाययोजना आणि मदत व बचावासाठीची सज्जता ठेवण्याच्या अनुषंगानेही त्यांनी विविध सूचना केल्या. जलसंपदा विभागाशी सातत्यपूर्ण समन्वय ठेवण्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत.

# झाडाखाली थांबले, ८ शेतमजुरांवर कोसळली वीज; दोघांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : जिल्ह्यात गेल्या १० दिवसांपासून सातत्याने पावसाने हजेरी लावली असून आजही सर्वत्र मुसळधार पाऊस पडत आहे. या पावसामुळं लातूर जिल्ह्यातील अनेक भागात पाणीच पाणी झालं आहे, नदी नाले तुडुंब भरुन वाहत आहेत. जिल्ह्यातील मांजरा, रेणा, तेरणा आणि तावरजा या नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मात्र, वीज कोसळून काही दुर्घटना घडत आहेत. शेतात मान्सून पूर्व मशागतीची कामे आणि शेंगा वेचण्यासाठी गेलेल्या ८ शेतमजुरांवर काळाने घाला घातला. अहमदपूर तालुक्यातील गोताळा येथे दुपारनंतर जोरदार पावसाला (ठरळप) सुरुवात झाली. पावसापासून वाचण्यासाठी हे ८ मजूर एका झाडाखाली थांबले होते. त्याचवेळी या झाडावर वीज (ड्ळसहींपळपस) कोसळली. या घटनेत ८ पैकी दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. त्यात, विक्रम कारले आणि रंजनबाई समुखराव यांचा जागीच मृत्यू झाला आहे. लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यात वीज पडून झालेल्या दुर्घटनेत दोन जणांचा मत्यू झाला असून उर्वरित सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच त्यांना तात्काळ अहमदपूरच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. येथे जखमींवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, घटनेची माहिती मिळतात अहमदपूरचे आमदार आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली. त्यानंतर तात्काळ सहा जणांना पुढील उपचारासाठी लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले आहे.

## पुण्यासह दौंड, इंदापूर, बारामतीत सर्वदूर मुसळदार पाऊस

## सोलापुरात जोरदार पाऊस, उजनीच्या पाणी पातळीत मोठी वाढ

# आभाळ फाटलं! मुसळधार पावसानं राज्याला झोडपलं, अनेक भागात जनजीवन विस्कळीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यभरात मुसळधार पावसानं धुमाकूळ घातला आहे. अनेक भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. तर काही ठिकाणी वाहतुकीवर देखील परिणाम झाला आहे. काल राज्यात मान्सून दाखल झाल्यानंतर पावसाचा जोर वाढल्याचं पाहायला मिळत आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. तसेच धरणांच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याचे दिसत आहे. जाणून घेऊयात राज्याच्या कोणकोणत्या भागात पावसानं हजेरी लावली आहे.

मुंबईसह नवी मुंबई ठाण्यात मुसळधार पाऊस

सकाळपासूनच मुंबईसह उपनगरात मुसळधार पाऊस सुरु आहे. सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचलं आहे. त्यामुळं वाहतुकीवर परिणाम झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तसेच लोकल रेल्वे सेवेवर देखील परिणाम झाला आहे. त्याचबरोबर ठाणे परिसारात देखील मुसळधार पाऊस सुरु आहे. दरम्यान, या मुसळधार पावसाच्या पार्श्नभूमीवर नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. नवी मुंबईतही मुसळधा पाऊस सुरु आहे.

राज्यात पावसानं (ठरळप) धुमाकूळ घातला आहे. राज्याच्या विविध भागात पावसामुळं जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांना नद्यांचं स्वरुप आल्याचं चित्र दिसत आहे. दरम्यान, गेल्या तीन ते चार दिवसांपासून सोलापूर (डेश्ररींी) जिल्ह्यात देखील जोरदार पाऊस सुरु आहे. यामुळं नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी बातमी म्हणजे राज्यातील सर्वात मोठ्या धरणांपैकी एक असलेल्या उजनी धरणाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. धरण सध्या वजा पातळीत आहे, मात्र लवकरच ते अधिक पातळीत जाणार आहे. उजनी धरण झपाट्याने वजा पातळीतून अधिक पातळीकडे जाऊ लागले आहे. धरणात सध्या १८००० क्युसिक वीसर्गाने पाणी जमा होत असून आजची टक्केवारी वजा ७.७२ एवढी आहे. त्यामुळं जर असाच पाऊस सुरु राहिला तर पुढच्या दोन दिवसात धरण अधिक पातळीत येण्याची शक्यता आहे.

काल रात्रीपासून विश्रांती घेतलेल्या पावसानं पुणे (झीपश) शहरात पुन्हा हजेरी लावली आहे. पुणे शहरासाठी आज पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. शहरातील अनेक भागात पावसाला सुरुवात झाली आहे. इंदापूर तालुक्यातील भिगवणमध्ये सकाळपासून मुसळधार पावसाने थैमान घातलं आहे, मुसळधार पावसामुळे संपूर्ण भिगवण परिसर जलमय झाला आहे. विशेषतः पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगतच्या सर्विस रोडला तळ्याचं स्वरुप प्राप्त झालं आहे. हा संपूर्ण रस्ता पाण्याखाली गेला आहे.



भिगवण बस स्थानकात पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. भिगवणच्या थोरात नगर भागात रस्त्यावरून पाण्याचे लोंढे वाहताना दिसत आहेत. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही घरांमध्ये पाणी देखील शिरलं आहे. दरम्यान दुसरीकडे दौंडला देखील पावसानं झोडपलं आहे. दौंडमधील स्वामी चिंचोली गावाला पावसाचा मोठा तडाखा बसला आहे. मुसळधार पावसामुळे गावात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने गावचा संपर्क तुटला आहे. अनेक घरे पाण्याखाली बुडाली आहेत. बारामती तालुक्यातून वाहणाऱ्या निरा डावा कालव्याला पिंपळी लिमटेक या ठिकाणी भगदाड पडलं आहे. या कालव्याचे सर्व पाणी नागरिकांच्या शेतात आणि घरामध्ये शिरले असून, यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झालं आहे.

आज दिवसभर पुणे शहरासह घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. पुढील ३ ते ४ तासांत जिल्ह्यांतील काही ठिकाणी ५० ते ६० किमी प्रतितास वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसह विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. नागरिकांनी सतर्क राहावे, अशा सूचना प्रशासनाच्या वतीनं देण्यात आल्या आहेत.

नाशिकमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून सतत मुसळधार पाऊस, शेती पिकांना फटका

नाशिकमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून सतत मुसळधार पाऊस पडत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झाले असून बळीराजा पुन्हा आर्थिक संकटात सापडला आहे. तर दुसरीकडे शेतकर्यांच्या (पान २ वर...)

## संपादकीय....

# जनजीवन विस्कळीत

राज्यात पावसानं धुमाकूळ घातला आहे. राज्याच्या विविध भागात पावसामुळं जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांना नद्यांचं स्वरुप आल्याचं चित्र दिसत आहे. दरम्यान, गेल्या तीन ते चार दिवसापासून सोलापूर जिल्ह्यात देखील जोरदार पाऊस सुरु आहे. यामुळं नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी बातमी म्हणजे राज्यातील सर्वात मोठ्या धरणांपैकी एक असलेल्या उजनी धरणाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. धरण सध्या वजा पातळीत आहे, मात्र लवकरच ते अधिक पातळीत जाणार आहे. उजनी धरण झपाट्याने वजा पातळीतून अधिक पातळीकडे जाऊ लागले आहे. धरणात सध्या १८००० क्युसिक वीसर्गाने पाणी जमा होत असून आजची टक्केवारी वजा ७.७२ एवढी आहे. त्यामुळं जर असाच पाऊस सुरु राहिला तर पुढच्या दोन दिवसात धरण अधिक पातळीत येण्याची शक्यता आहे. राज्यभरात मुसळधार पावसानं धुमाकूळ घातला आहे. अनेक भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. तर काही ठिकाणी वाहतुकीवर देखील परिणाम झाला आहे. काल राज्यात मान्सून दाखल झाल्यानंतर पावसाचा जोर वाढल्याचं पाहायला मिळत आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. तसेच धरणांच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याचे दिसत आहे. जाणून घेऊयात राज्याच्या कोणकोणत्या भागात पावसानं हजेरी लावली आहे. सकाळपासूनच मुंबईसह उपनगरात मुसळधार पाऊस सुरु आहे. सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचलं आहे. त्यामुळं वाहतुकीवर परिणाम झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तसेच लोकल रेल्वे सेवेवर देखील परिणाम झाला आहे. त्याचबरोबर ठाणे परिसारात देखील मुसळधार पाऊस सुरु आहे. दरम्यान, या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. नवी मुंबईतही मुसळधा पाऊस सुरु आहे. विश्रांती घेतलेल्या पावसानं पुणे शहरात पुन्हा हजेरी लावली आहे. पुणे शहरासाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# राज्यात मान्सूनची तुफानी एन्ट्री

(पान १ वरून..) ३ महिन्यात होईल). मात्र तुर्तास तेथून पाणी येऊ नये म्हणून तात्पुरती संरक्षक भींत उभारण्याचे काम सुरु होते. हे पूर्ण काम १० जूनपर्यंत पूर्ण होईल, असा अंदाज होता. मात्र, पाऊस लवकर आला. लगतच्या भागातून पाण्याचा मारा आणि मुसळधार पावसाने यामुळे ती पडली. खबरदारीचा उपाय म्हणून वरळी ते आचार्य अत्रे चौक येथील मेट्रो वाहतूक तात्पुरती थांबविण्यात आली आहे. आरे जेव्हीएलआर ते वरळीपर्यंतची भुयारी मेट्रो वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे. मेट्रो-३ चे अभियंते आणि सुरक्षा चमू यावर युद्धपातळीवर काम करीत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.

**मुंबईत सकाळी ९ ते १० दरम्यान ढगफुटीसदृश्य पाऊस**

मुंबई महापालिकेच्या काही ऑटोमॅटिक वेदर स्टेशनवर एका तासात ८० मिमीहून अधिक पावसाची नोंद...तर दक्षिण मुंबईतील एका स्टेशनवर १०४ मिमी पावसाची नोंद झाली. मात्र, आयएमडीनं सकाळी ९ ते १० दरम्यान झालेला पाऊस हा ढगफुटी नसल्याचं सांगितलं आहे.आयएमडीकडून दक्षिण मुंबईतील त्या एका तासातील पाऊस हा अतिमुसळधार असल्याचं स्पष्ट करण्यात आलेलं आहे.

मुंबईतील महत्त्वकांशी प्रकल्प एक्का लाइन-३ ला पावसाचा फटका बसला आहे. मुंबईतील आचार्य अत्रे चौक वरळी मेट्रो स्थानकावर पावसाचे पाणी साचले आहे. मेट्रोमधून उतरताच प्रवाशांना तळ्यात उतरल्याचा भास होताना दिसला. मुंबईतील अंडरग्राउंड मेट्रो-३ ही नुकतीच धावू लागली. मात्र मुंबईतील पहिल्याच पावसात भुयारी मेट्रोला याचा फटका बसला.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ऐतिहासिक अनमोल संदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मित्र हो,

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने प्रत्येक आठवड्याला रविवारी साप्ताहिक कार्यशाळा आयोजित केली जाते. ज्यात त्या आठवड्यातील एखाद्या तारखेला आपल्या आदर्श महापुरुषांनी केलेले महत्वपूर्ण विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त सदरील ऐतिहासिक विधानावर कार्यशाळा आयोजित केली जाते. जेणेकरून ऐतिहासिकदृष्ट्या त्या काळची प्रासंगिकता, वर्तमानातील संदरभीय आवश्यकता आणि भविष्यकालीन उपयोगिता यावर सातत्याने विवेचन केले जात आहे. या कळिचा भाग म्हणून २५ मे २०२५ ला मी माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस बुद्ध धर्माच्या प्रसारातच व्यतित करण्याचे ठरविले आहे. या २७ मे १९६३ च्या विधानावरस११२ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. तेव्हा हे लक्षात आले की त्या दिवशी तर रमाई आंबेडकरांचा स्मृती दिन सुद्धा आहे. त्या निमित्ताने अभिवादन पर थोडक्यात काही बाबी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाला आकार देणारी कारुण्य मूर्ती रमाई सुख दु:खाच्या प्रसंगात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत उभी राहिल्याचे अनेक ऐतिहासिक प्रसंगातून पहायला मिळते. साध्या भोळ्या अर्धांगिनीने डॉ. बाबासाहेब आंबेडकराकडे कोणत्याही गोष्टीसाठी हट्ट धरला नव्हता. पतीच्या सुखातच आपले सुख आहे असे मानून, पतीची निष्ठेने सेवा करने ज्यामुळे कौटुंबिक समृद्धी वृद्धींगत होईल या दृष्टीने जीवन कंठण्याचा अंगभूत गुणधर्म तिने पाळला होता. जीवनाला आकार प्राप्त होत असतांना स्थिरावण्याचे दिवस येण्याची शक्यता पहायला मिळत होती, अशातच रमाई मात्र शरीर अस्वास्थ्यामुळे हे जग सोडून जाण्याची भाषा बोलत असे. त्या क्षणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे काळीज पिळवटून येतांना रडू कोसळायचे, अशावेळी नयनातून कोसळणाऱ्या अश्रूधारा बघून रमाई बाबासाहेबांची समजूत काढताना तुम्ही धीर सोडू नका! असे हताश होऊ नका! म्हणायची तेव्हा अश्रू पुसून घराबाहेर पडताना रमाईला काळजी घे असा सल्ला देऊनच बाहेर पडायचे. अशा परिस्थितीत मात्र घराबाहेर पडलेले पती सुखरूप घरी परत यावेत याची रमाईला जास्त चिंता वाटत असे कारण त्या काळात सामाजिक परिस्थितीच तशी होती. परिणामी राजगृहाच्या पायरीवर ती वाट पहात बसायची. उशीरा का होईना घरी आल्यावर बाबासाहेबांचे दर्शनाने चिंता कमी होऊन रमाईला झोप येत असे. १९३४ मध्ये वेरुळच्या दौऱ्यावरून परतल्यावर चार दिवसांपासून रमाई अंथरुणावर खिळलेली पहायला मिळाली. या काळात रमाईला क्षयाने विळखा घातल्याने दिवसेंदिवस तिची प्रकृती चिंताजनक होत चालली होती. कारण उपचाराला हव्या त्या प्रमाणात शरीर प्रतिसाद देत नव्हता. त्यामुळे उपचार करणारे डाक्टर सुद्धा हतबल झाले होते. तशाही परिस्थितीत चिंता सोडून प्रकृतीची काळजी घ्यायचा सल्ला देणारे बाबासाहेब पनवेलला मुलांच्या वस्तीगृहाची स्थापना करायला गेले असताना तातडीचा निरोप मिळाल्याबरोबर मुंबई ला परत आले. तेव्हा रमाईचे डोळे खोल गेले होते, आवाज बसला होता, बोलण्याचा प्रयत्न करताना ओठ तेवढे हलायचे पण जिभेची हालचाल होत असली तरी स्वर बाहेर पडण्यासाठी आवश्यक क्षमता संपुष्टात आली होती. हे दृश्य बघून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अंतकरण भरून आले होते. अशाही परिस्थितीत बाबासाहेब उपचार करणाऱ्या डॉक्टरांना म्हणाले की, वाटेल ते करा पण माझ्या रामू ला वाचवा. तेव्हा प्रत्युत्तरादाखल डॉक्टर म्हणाले की, आता जास्त दूर कुठे जाऊ नका, काळजी घ्या. या सुचक इशाऱ्याचा अर्थ बाबासाहेब आंबेडकरांना कळला होता. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे औषधे दिली जात असताना त्राण उरलेले नसताना सुद्धा त्या बोलण्याचा प्रयत्न करीत होत्या. काय सांगायचे असेल बरे त्यांना तर 'यशवंतांना संधीवाताचा आजार आहे. तो अधूनमधून अंथरुण धरतो, त्याची काळजी घ्या. तेवढाच आपल्या काळजाचा तुकडा उरला आहे. त्याला आईची उणीव भासू देऊ नका! आईची माया द्या!' असे ती सांगू पहात असावी पण काळाने ती परवानगी नाकारली होती. तो संवाद होऊ शकला नाही. शेवटी २७ मे १९३५ ची पहाट राजगृहात काळोखाचे साम्राज्य घेऊनच उजाडली आणि सकाळी ९ :०० वाजता त्याग मूर्ती, कारुण्य मूर्ती यशवंतरावांच्या आई, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रामूचा, वंचित, पीडितांच्या आईचा अंत झाला होता. ज्यामुळे राजगृहावर शोककळा पसरली आणि सारा देश शोकसागरात बुडाला.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळीसमोरील आव्हाने परतवून लावण्यासाठी प्रदीर्घ लिखाण केले आहे. त्यापैकी एक म्हणजे THE PRTITION OF INDI अर्थात भारताची फाळणी हा एक महत्वपूर्ण ग्रंथ होय. हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सुविद्य पत्नी रामू यांना अर्पण केला आहे. त्यात नमूद केल्याप्रमाणे : INSCRIBED TO THE MEMORY of RMU : s a token of my appreciation of her goodness of heart, her nobility of mind and her purity of character and also for the cool fortitude and readiness to suffer alongwith me which she showed in those friendliness days of want and worries which fell to our श्रीं. आदरांजली अर्पण करताना आपण याचीही जाणीव ठेवली पाहिजे.

१९५३ या वर्षी २७ मे ला बुद्ध जयंती होती. तसेच त्याच दिवशी रमाईचा स्मृती दिन सुद्धा होता. त्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नरे पार्क मुंबई येथे आयोजित सभेत ऐतिहासिक अनमोल संदेश दिला तो असा की, बौद्ध धर्माचा उपासक असल्याने कृतीशीलतेचा पाईक व्हावे म्हणून मी माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस बुद्ध धर्माच्या प्रचारातच व्यतित करण्याचे ठरविले आहे. याची जाणीव ठेवून ज्यांना ज्यांना रमाई, बाबासाहेब, बुद्ध कळला त्यांनी त्यांनी आता या कार्याला वेगाने गतिमान करण्यासाठी प्रयत्न करने हीच खरी रमाईला अभिवादन पर आदरांजली ठरेल. रमाईचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ज्याप्रमाणे रमाईने जीवन व्यतीत केले त्याप्रमाणे जीवन व्यतीत करून कौटुंबिक, सामाजिक विकास घडवून आणण्याचा भारतीय महिलांनी प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्यातील सर्व सद्गुण आजच्या महिलांनी अगिकारून संस्कारीत केले तर परिवारातील सर्व सदस्यांना किमान आंबेडकराईट आंदोलनाचे अनुयायी तरी होता येई. सदरील संदेशाची पूर्तता करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे आदेशयुक्त संदेश दिला होता की, बौद्धांचे आद्य कर्तव्य आहे की आपण बुद्ध विहारात गेले पाहिजे. तर २५ नोव्हेंबर १९५६ ला बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, माणसा माणसातील संबंध प्रेम, करुणा या तत्त्वानुसार जोडणाऱ्या बौद्ध धम्माचा मध्यवर्ती सिद्धांत 'समता' आहे. तर मग आपण समतामुलक समाज निर्माण करण्यासाठी परिस्थितीनुरूप निर्णय घडवून आणण्यासाठी आपण दर रविवारी बुद्ध विहारात जाऊन बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशयुक्त संदेशाचे पालन करून पुढील पिढी घडविण्यासाठी आपल्या अपत्यावर तसे संस्कार करीत आहोत काय? असा प्रश्न स्वतःला विचारून कुटुंबासह बुद्ध विहारात गेले पाहिजे. हीच खरी या प्रसंगी रमाईला आदरांजली ठरेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

जय रमाई!!!

लेखक : मेश्राम बी. बी. संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना)
संपर्क : ९४२१६७८६२८
stdbbm@gmail.com

# अवकाळी पावसाने व पुराने नुकसानग्रस्त पिकांचे व मालमत्तांचे पंचनामे करून भरपाई द्यावी : हर्षवर्धन पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यामध्ये रविवारी (दि.२५) झालेल्या ढगफुटीसदृश अवकाळी पावसाने शेती पिकांचे, नागरिकांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे. तसेच नीरा नदीला मोठा पूर आला आहे. त्यामुळे शासनाने नुकसानग्रस्त पिकांचे, फळबागांचे व मालमत्तांचे तात्काळ पंचनामे सुरु करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी रविवारी (दि.२५) केली. या संदर्भात हर्षवर्धन पाटील यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी व इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे यांच्याशी रविवारी संपर्क साधून चर्चा केली.

हर्षवर्धन पाटील म्हणाले,

### जिल्हाधिकारी व तहसीलदारांशी चर्चा

इंदापूर तालुक्यातील भिगवण, सणसर परिसरातील सुमारे १२ ते १५ गावांना या मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला आहे. यामध्ये जांब, कुरवली, चिखली, सणसर, उद्धट, लाकडी, निंबोडी, शेटफळ गढे, मदनवाडी, भिगवण, भिगवन स्टेशन आदी गावांसह आणि निरा नदीकाठच्या पूरग्रस्त गावांचा समावेश आहे. या सर्व परिसरातील नागरिकांच्या राहत्या घरांमध्ये पाणी शिरल्याने सुमारे २०० ते २५० कुटुंबांना स्थलांतरित करण्यात आले आहे.

ढगफुटीसदृश अवकाळी पावसाने नुकसानग्रस्त शेती पिके, फळबागा, घरे व मालमत्तांचे पंचनामे हे कृषी, महसूल, ग्राम विकास खात्याने तातडीने पूर्ण करावेत, एकही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहू नये, अशी सूचनाही हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे.

ते पुढे म्हणाले, इंदापूर तालुक्यात झालेल्या अवकाळी पाऊस द्राक्षे, डाळिंब, केळी, पेरू

### इंदापूर तालुक्यात ढगफुटीसदृश पावसाचे थैमान

आदी या फळबागांचे तसेच मका, कांदा, भुईमूग, चारा पिकांसह शेतातील इतर सर्व उभ्या पिकांचे नुकसान झालेले आहे. तसेच ढगफुटीसदृश पावसामुळे अनेक गावातील शेतातील माती वाहून गेली आहे, तसेच पशुधनाचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे सरकारने विना विलंब पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देऊन दिलासा द्यावा, असे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

सदरच्या ढगफुटीसदृश पावसामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांवरील पुलांची हानी झाली आहे, त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. तसेच शेतातील अनेक ठिकाणची माती वाहून गेली आहे, त्याचप्रमाणे पशुधनाचे नुकसान झाले आहे. या सर्वांचेही पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणीही हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे. दरम्यान, नीरा नदीला पूर आल्याने नदीकाठच्या गावांमधील लोकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहनही हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे. तसेच जनतेला काही अडचण आल्यास माझ्या संपर्क कार्यालयाशी संपर्क साधावा, असे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

# आभाळ फाटलं! मुसळधार पावसानं राज्याला झोडपलं, अनेक भागात जनजीवन विस्कळीत

(पान १ वरून...) नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे देखील अद्याप झाले नसल्याने शेतकरी नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी करत आहे. नाशिक तालुक्यात शेतकऱ्यांच्या उभ्या कांदा पिकात पाणी साचल्याने संपूर्ण कांदा शेतात सडल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. तर जास्त पावसाने शेडमध्ये असलेली शिमला मिरची पिक खराब होऊन शेतकर्याचा हाता तोंडाशी आलेला घास हिरवल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

तर दुसरीकडे नाशिक जिल्ह्याच्या सिन्नरमध्ये झालेल्या पावसात बाजार समितीमधील खळ्यात पावसाचे पाणी सचल्यानं कांदा गोण्यासह भिजला आहे. तर काही प्रमाणात कांदा अक्षरक्ष: वाहून गेला आहे. शेतीत भाजीपाला आणि बाजार समिती मधील कांदाचे मोठं नुकसान झाल्याने बळीराजाचे स्वप्न भंगल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त केली जातेय.

पावसाचा फटका राजगड जिल्ह्याला बसला असून नदी, नाले आणि सखोल भागात पाणीच पाणी झाले आहे. तर आजपासून पुढील ७ दिवस राज्यात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून (खचऊ) देण्यात आला आहे. दरम्यान, हिंदवी स्वराज्याची राजधानी असणाऱ्या किल्ले रायगड (ठरळसरव ॠीं) महामार्गावरील कोंझर घाटात असलेल्या धबधब्यातील येणाऱ्या मुसळधार पाण्याने नव्यानं बांधण्यात आलेल्या मोरीच्या परिसरातील बायपास मार्ग खचला आहे. परिणामी या मार्गावरील वाहतूक पोलीस प्रशासनाकडून बंद करण्यात आली आहे. किल्ले रायगड परिसरात देखील ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तविलेलया अंदाजानुसार आज रायगडमध्ये सकाळपासून मुसळधार पावसाची रिपरिप सुरू आहे. रायगडच्या श्रीवर्धन तालुक्याला पावसाने अक्षरक्ष: झोडपले आहे. या जोरदार पावसामुळे श्रीवर्धन तालुक्यातील वाळवटी गावात पाणीच पाणी झाले आहे. श्रीवर्धनमध्ये तब्बल १३६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून ही नोंद आतापर्यंत सर्वाधिक असल्याची माहिती समोर आली आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पावसाची संततधार कायम**

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पावसाची संततधार कायम आहे. जिल्ह्यातील सहाही बंधारे पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. पंचगंगा नदीची पाणीपातळी १७ फूट ५ इंच इतकी झाली आहे. गेल्या ४८ तासात पंचगंगा नदीची पाणीपातळी केवळ पाच इंचांनी वाढली आहे.

**रत्नागिरीत मुसळधार पाऊस, एक जण गेला वाहून**

रत्नागिरीत मुसळधार पाऊस सुरु आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. दापोलीमधील वणंदमध्ये एकजण पाण्याच्या प्रवाहातून वाहून गेला आहे. कामावरुन घरी जात असताना पाण्याच्या लोंढ्यात सायकल सहित वाहून गेला आहे. पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेल्यामुळे मदतकार्यात आले अडथळे. स्थानिकांडूक शोक कार्य सुरु आहे. राजेंद्र सोनू कोळंबे ( ४८) असे पाण्यात वाहून गेलेल्या व्यक्तीचे नाव आहे. नाईट ड्युटी करुन सकाळी सायकल वरून घरी परतत असताना पाण्याच्या लोंढ्यात वाहून गेला आहे. पुलावरुन पाणी जात असताना रस्ता ओलांडणे महागात पडले आहे.

**सातारा जिल्ह्यात मुसळधार पाऊस**

सातारा जिल्ह्यातही मुसळधार पाऊस सुरु आहे. फलटण तालुक्यातील धुमाळवाडी या फळांच्या गावात अतिवृष्टीमुळे प्रचंड असं नुकसान झाल्याचे चित्र पाहायला मिळतंय. धुमाळवाडी हे गाव हे फळांचे गाव म्हणून संपूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे या गावात घरटी फळबाग पिकवली जाते. ३० वर्षानंतर एवढा मोठा पाऊस झाला यामुळे या गावात फळबागांचे प्रमाण जास्त आहे मात्र काल झालेल्या पावसानं या फळबागांचं प्रचंड असं नुकसान झालं असून यामध्ये डाळिंब,पेरू ड्रॅगन फ्रुट,चिकू, सिताफळ अशा १७ प्रकारच्या फळबागा पाण्याखाली गेल्या असून यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू पाहायला मिळतायेत या झालेल्या ढगफुटी सतृश्य पावसामुळे कोट्यावधींच नुकसान हे शेतकऱ्यांचे झालेले पाहायला मिळतंय. सरकारनं आम्हाला मदत करावी अन्यथा आमचं घर चालवणार तरी कसं असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे.

**ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमध्ये अवघ्या ४ तासात तब्बल १६० मिलिमीटर पावसाची नोंद**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमध्ये आज अवघ्या ४ तासात तब्बल १६० मिलिमीटर पावसाची नोंद झालीय. उल्हास नदीने इशारा पातळी गाठल्यामुळे नगरपालिका प्रशासनाने १०० नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं असून पूरस्थिती निर्माण झाल्यास १२ हजार नागरिकांचं स्थलांतर करण्याची पालिकेची तयारी असल्याची माहिती मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी दिलीय.

**वाशिम जिल्ह्यात मुसळधार पाऊस**

वाशिम जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेंदूरजना मोरे गावाकडून मंगरुळपीर शहराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील पूल वाहून गेल्याने या मार्गावरून वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झालाय वाहनधारकांना वाहन चालवतांना मोठी कसरत करावी लागत आहे. या पुलावरून दररोज वाहने आणि पादचारी ये-जा करतात. मात्र, पुलाच्या खचल्यामुळे आता मोठे वाहनांची वाहतूक बंद झाली झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना दूरच्या मार्गाचा वापर करावा लागत.

**लातूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस, टरबुज आणि कांदा पिकांचं मोठं नुकसान**

लातूर जिल्ह्यात झालेल्या पावसाचा टरबुज आणि कांदा पिकांना मोठा तडाखा बसलाय. यामुळं टरबुज आणि कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेत. लातूर जिल्ह्यातील दगडवाडी येथील शेतकरी उत्तम खोंड यांच्या दोन एकरातील टरबुजचे आणि चार एकरातील कांद्याचे पावसामुळे नुकसान झाले असून, शेतकरी विक्रम भोसले यांचेही दोन एकरातील टरबुज आणि तीन एकरातील कांद्याला पावसाचा तडाखा बसलाय. या शेतकऱ्यांनी काढून ठेवलेला कांदा पावसात भिजल्याने जागेवरच सडून गेला असून, यामुळे त्यांचे जवळपास सहा ते सात लाखांचे नुकसान झालंय. मोठा आर्थिक खर्च करून पीक जोपासल्यानंतर ऐन काढणीच्या वेळी हातचे उत्पन्न गेल्याने सध्या हे शेतकरी चिंतेत असून, या संकटसमयी शासनाने आर्थिक मदत करण्याची मागणी त्यांनी केलीय.

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातही मुसळधार पाऊस**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातही मुसळधार पाऊस सुरु आहे. चिपळूण आणि गुहागरमध्ये मोठा पाऊस झाला आहे. मिरजोळीमध्ये रस्त्यावर पाणी आल्यामुळं वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. वाहनचालकांना पाण्यातून मार्ग काढत प्रवास करावा लागत आहे. मुसळधार पावसामुळे शेतजमिनी पाण्याखाली गेली आहे.

रायगड जिल्ह्यातही मुसळधार पाऊस

रायगड जिल्ह्यातही मुसळधार पाऊस सुरु आहे. कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील मौजे बिरदोले गावातील रोशन कचरू कालेकर वय- २५ वर्ष या तरुण मुलाचा शेतावर काम करीत असताना विज पडून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनास्थळी पोलिसांची टीम पोहचली असून पुढील अधिक माहिती घेत आहेत. तालुक्यातील उल्हास नदीला पूर आल्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.या भागातील ३५ गावांचा संपर्क तुटला आहे. जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी**

मान्सून मुंबईसह महाराष्ट्रात दाखल झाला असून हवामान खात्याने मुंबई, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी उद्या रेड अलर्ट आहे. पालघरसाठी यलो अलर्ट आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूरच्या घाट परिसरात पावसाचा जोर आणखी काही दिवस कायम राहणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची सुरक्षितता, बचाव व मदतकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. त्यासाठीच्या उपाययोजना तात्काळ राबवाव्यात. मुसळधार पावसाची शक्यता असलेल्या भागातील नागरिकांनी सावध रहावे. सुरक्षितस्थळी आसरा घ्यावा. स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात राहून त्यांच्या सूचनांचे पालन करुन सहकार्य करावे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी वारीच्या अनुषंगाने पालखी सोहळा प्रमुखांच्या सर्व सूचनांची अंमलबजावणी वारीपूर्वी करण्यात येणार : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## सर्व संबंधित यंत्रणांनी पालखी तळांवर मुरुमाचे साठे, रोलर व जेसीबीची व्यवस्था करून ठेवावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून, आषाढी यात्रा सोहळ्याच्या अनुषंगाने यापुर्वी पालखी मार्ग, तळ व रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पालखी सोहळा प्रमुखांकडून काही मागण्या व सूचना करण्यात आलेल्या होत्या, त्या सूचनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. तसेच पालखी सोहळ्याच्या विश्वस्तांकडून काही पालखी मार्ग व तळासंबंधी नवीन सूचना व मागण्या प्राप्त झाल्या असून त्या सर्व मागणीची पूर्तता पालखी सोहळा जिल्ह्यात दाखल होण्यापूर्वी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.




आषाढी यात्रेच्या पुर्वतयारीबाबत केबीपी कॉलेज, पंढरपूर येथे दहा मानाच्या पालख्यांचे विश्वस्त, अध्यक्ष, सचिव यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, सा.बां.अधिक्षक अभियंता संजय माळी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले, प्रांताधिकारी सचिन इथापे, सदाशिव पडदुणे, विजया पांगारकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, कार्यकारी अभियंता अमित निमकर, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी कार्यकारी अभियंता सोमशेखर हसापुरे, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद म्हणाले, गतवर्षीच्या पालखी सोहळ्यासाठी पालखी मार्गावर, तळांवर तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी प्रशासनाकडून करण्यात आलेल्या सोयीसुविधांबाबत पालखी सोहळा प्रमुखांनी समाधान व्यक्त केले. पालखी सोहळ्यासाठी अजूनही काही ठिकाणी सुधारणा करण्याची आवश्यकता असून, यंदा पाऊस जास्त होण्याची शक्यता असल्याने काही ठिकाणी वाढीव मुरमीकरण करण्याची आवश्यकता आहे. पालखी तळ्याच्या सर्व ठिकाणी मुरमीकरण करण्यात येणार आहे. तसेच मुरुमाचे साठे ठेवण्यात येणार असल्याने ऐन वेळेला ज्या ठिकाणी मुरमीकरण करण्याची आवश्यकता आहे त्या ठिकाणी तात्काळ मुरमीकरण केले जाईल त्याचबरोबर त्याठिकाणी रोलर, जेसीबी मशीनची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे.

तसेच आषाढी यात्रा कालावधीत गर्दी व्यवस्थापनाबरोबरच यावर्षी जोरदार पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असल्याने पावसामुळे कोणत्या प्रकारची आपत्ती येऊ शकते, तसेच कोणत्या अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या गोष्टी गृहीत धरून भाविकांच्या सुरक्षेसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखड्या अंतर्गत व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात येईल. त्याचबरोबर आषाढी यात्रा सोहळा कालावधीत पालखी सोहळ्यासह वारकरी, भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता प्रशासनाडून घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी यावेळी सांगितले.

यावेळी बैठकीत दहा मानाच्या पालख्यांचे विश्वस्त, अध्यक्ष, सचिव यांनी पालखी सोहळ्यासोबत दिवसेंदिवस दिंड्यांची संख्या वाढत असल्याने काही ठिकाणचे पालखी-तळ कमी पडत असून ते तळ वाढवून मिळावेत. पालखी सोहळ्यासोबत महिलांसाठी पिंक टेन्ट व पिंक टॉयलेट उपलब्ध करून द्यावेत. पालखी सोहळ्याला आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा. टँकरची संख्या वाढवावी, पालखी सोहळे संबंधित मुक्कामाच्या ठिकाणावरून पुढे गेल्यानंतर तात्काळ स्वच्छता करावी, पालखी सोहळे पालखी मार्गावरून जात असताना वाहतुकीचे नियोजन व्हावे. पालखी तळांवर मुरमीकरण करावे. तसेच वाखरीचा तळ उत्कृष्ट मॉडेल तळ म्हणून विकसित करावा. सर्व पालखी सोहळे वाखरी येथे दाखल झाल्यानंतर सोहळ्याचे स्वागत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्वागत कक्ष उभारले जातात. स्वागताचे कार्यक्रम घेतल्याने पालखी सोहळे पंढरपुरात दाखल होण्यास उशीर होतो यासाठी स्वागत कक्षांची संख्या कमी करावी जेणेकरून पालखी सोहळे लवकर पंढरपुरात दाखल होतील, अशा सूचना यावेळी केल्या.

## थोडक्यात...

### घरासमोर बांधलेल्या जनावरांची चोरी

सोलापूर : शहरातील मजरेवाडी येथे घरासमोर बांधलेले जर्शी गाय व तांबडे गिर जातीचे खोंड असे ५५ हजार रुपये किमतीचे मुद्देमाल चोरून नेल्याची घटना जुलै २०२३ ते २५ मे २०२५ दरम्यान घडली. या प्रकरणी तनवीर गुलाब मुजावर (वय-२२-,रा.शोभादेवी नगर,मजरेवाडी) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे

यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी हे राहत्या घरासमोर टाळ्या पांढऱ्या लाल काळे रंगाची जर्शी गाय व तांबडे गिर जातीचे खोंड घरासमोर बांधले होते.यावेळी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या संमतीशिवाय मुद्दाम लबाडीने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते कृषिमंत्री मंत्री श्री कोकाटे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, विशेष कार्य अधिकारी, ईशाधीन शेळकंदे, उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब लांडगे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत मोरे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# औसा खरेदी-विक्री संघास विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव :

तालुक्यातील औसा तालुका शेतकरी खरेदी विक्री संघात महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबासन दानवे यांनी सदिच्छा भेट दिली खरेदी-विक्री संघाच्या सर्व संचालक व शिवसैनिकांसोबत खरेदी विक्री संघ, बाजार समिती, हमीभाव शेतकऱ्यांच्या विविध विषयावर चर्चा केली. औसा तालुका खरेदी विक्री संघाची कामकाजाची पाहणी केली असता समाधान व्यक्त केले व नूतन संचालक मंडळ सभापती उपसभापतीचे स्वागत केले.



याप्रसंगी शिवसेना जिल्हप्रमुख तथा खरेदी विक्री संघाचे सभापती संतोष सोमवंशी शिवसेना सहसंपर्क नामदेव चालक, महिला जिल्हा संघटिका जयश्रीताई उटगे, युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, तालुकाप्रमुख आबासाहेब पवार, उपजिल्हाप्रमुख संतोष सूर्यवंशी, माजी तालुकाप्रमुख संजय उजळंबे, श्रीराम कुलकर्णी, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष सलीम पटेल, महिला तालुका संघटिका सुनीता भोसले, शहरप्रमुख सुरेश भुरे, मारुती मगर, मनोज सोमवंशी, सुरेश मुसळे, बसवराज बरदापुरे, श्रीराम कुलकर्णी, श्रीधर साळुंखे, केशव डांगे, गणेश गायकवाड, सचिन पवार, सोयब सय्यद, रेखा पुजारी आदीसह शिवसैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# निफाडला श्री शनेश्वर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरात सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्री शैनेश्वर जयंती उत्सव समितीच्या वतीने प.पू. रामप्रभुजी महाराज अंजनापुर व साधुसंतांच्या प्रमुख उपस्थितीत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून उत्साहात साजरी करण्यात आली





दिनांक २५/ ५ /२०२५ रोजी स.८ वा. ग्रामदैवतांना निमंत्रित करून स.९ ते १ या वेळेत तातेड हॉस्पिटल उगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, सायं. ६ वा.शनि भक्त प.पु. रामपूर जी महाराज प्रेरित श्रीक्षेत्र अंजनापुर ते श्रीक्षेत्र निफाड शनि भक्तांच्या पायी दिंडीचे स्वागत करण्यात आले, तर ८ वा. सद्गुरु गणेश महाराज भजनी मंडळाचे शनी चौकात भजनाचा कार्यक्रम झाला, दि. २६ रोजी स. ६ ते ७ श्री शैनेश्वर महाराज अभिषेक व महापूजा करण्यात आली असून ७ ते ८ सामुदायिक शनी महात्म्य पठण व श्री सत्यनारायण पूजा करण्यात आली,८ ते १० नवग्रहां सह श्री शैनेश्वर महाराज याग- होम हवन तसेच ९ ते १० श्रींची टाळ मृदुंगाच्या व ढोल ताशांच्या गजरात भव्य ग्रामप्रदक्षणा करण्यात आली ,असून स. १० ते ११ या वेळेत संत पूजनाबरोबरच माझी सैनिक एम.पी.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, दु.१२ ते ३ या वेळेत उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले रात्री ९ ते ११वेळेत ह भ प रामदास महाराज शास्त्री श्रीरामपूर यांचे कीर्तन झाले याप्रसंगी निफाड परिसरातील नागरिकांनी व शनी भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

### प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी केले शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन

### पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन कडून स्वेरीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन

# स्वेरीमध्ये 'विकसित गाव अभियान' अंतर्गत 'जलतारा प्रकल्प शुभारंभ' व 'सेंद्रिय रत्न पुरस्कार' सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : स्वेरीमध्ये 'विकसित गाव अभियान' अंतर्गत 'जलतारा प्रकल्प शुभारंभ' व 'सेंद्रिय रत्न पुरस्कार' सोहळा नुकताच संपन्न झाला. यामध्ये 'मिशन विकसित गाव अभियान अंतर्गत खेड्यांचा समृद्ध विकास या विषयावर सोलापूर जिल्हा (ग्रामीण)चे पोलीस अधीक्षक, आय. पी. एस. अतुल कुलकर्णी यांनी उदघाटक म्हणून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व जलताराचे जनक प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.







पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन कडून स्वेरीमध्ये आयोजिलेल्या या भव्य कृषी कार्यक्रमात सोलापूर व जवळपासच्या जिल्ह्यातील अनेक शेतकरी, पोलीस पाटील उपस्थित होते. महाराष्ट्र गीतानंतर प्रास्ताविकात किसान संस्थापक व मिशन विकसित गाव अभियानचे जिल्हा समन्वयक व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी नानासाहेब उर्फ भुजंगराव कदम यांनी शाश्वत कृषी तंत्रज्ञान समाजाला कसे उपयोगी ठरते हे सांगून संतांचे मार्गदर्शन आणि पोलिसांचा दंड हे समाजाला योग्य स्थितीत ठेवतात. असे सांगून संपूर्ण कार्यक्रमाचे स्वरूप सांगितले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज् ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी स्वागत केले व विकसित तंत्रज्ञान आणि उत्तम शेती या संदर्भात अभ्यासपूर्ण भाष्य केले. जलतारा प्रकल्पचे जनक प्रा.डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी जलतारा प्रकल्पाच्या माध्यमातून एका पावसाळ्यात चार लाख लिटर पाणी जमिनीमध्ये कसे मुरवले जाते याचे स्वेरी कॅम्पसमध्ये वैज्ञानिक सादरीकरण केले व प्रत्यक्ष जलतारा प्रकल्प शुभारंभ केला. पुढे उदघाटक पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी 'मिशन विकसित गाव अभियान' अंतर्गत जलसंधारण, वृक्षारोपण, गुन्हेगारी मुक्त गाव, शाश्वत कृषी व्यवस्था' या संदर्भात उपस्थितांना अतिशय उपयुक्त मार्गदर्शन केले व सोलापूर जिल्ह्यातील पोलीस स्टेशन माध्यमातून हा मॉडल प्रकल्प १०० गावांमध्ये राबविण्याचे सुतोवाच केले. यावेळी चाळीसगावच्या फर्टीलायझर लॉक टेक्नॉलॉजीचे संशोधक शास्त्रज्ञ प्रकाश पवार यांनी एफ कॉन प्रज्वल बायोमिनवा वापरा द्वारे रासायनिक खतांची बचत व भरघोस उत्पादन कसे घेता येते याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. जिल्हा समन्वयक नानासाहेब कदम यांनी मिशन द्वारा एकरी शंभर टन ऊस उत्पादन, केळी, द्राक्ष, बेदाणा, डाळिंब, भाजीपाला क्लस्टर कशा पद्धतीने वर्षभर राबवू शकतो याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच राज्यस्तरीय कृषी संमेलन जून मध्ये घेणार असल्याची घोषणा केली. यावेळी डॉ.बी.पी. रोंगे यांनी 'मिशन विकसित गाव अभियान साठी सहकार्य करु' असे सांगितले.

'यावेळी सध्याच्या बाजारातील इतर रासायनिक व शेतीत कमी उत्पादन देणारी व हानिकारक खते न वापरता सेंद्रिय खते वापरून विक्रमी पीक काढणाऱ्या शेतकऱ्यांचा यावेळी भव्य सत्कार करण्यात आला. यामध्ये अंध शेतकरी मालोजी चव्हाण (जाम गाव, ता.माढा), स्वप्निल आसबे (अनवली), गणेश नवले (टेंभूर्णी), संजय साबळे (पंढरपूर), शुभम बागल (पंढरपूर), उमेश महाराज देशमुख (बार्शी), अजिंक्य लोकरे (टेंभूर्णी), रवि भोसले (अनवली) व संतोष पवार (वैराग) या सोलापूर जिल्ह्यातील 'सेंद्रिय शेती' करणाऱ्या नऊ सेंद्रिय शेतकरी यांना 'सेंद्रिय शेती रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

जलतारा प्रकल्पाच्या या कार्यक्रमासाठी श्री श्री साखर कारखाना राजेवाडीचे चेअरमन शेषेगिरी राव, पंढरपूर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अर्जुन भोसले, पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, पोलीस अधिकारी, सोलापूर जिल्ह्यातील पोलीस पाटील, शेतकरी, ग्रामस्थ, मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून प्रशासनाने नुकसान भरपाई द्यावी - प्रविण माने

## ढगफुटीसदृश पावसाने सर्वत्र प्रचंड नुकसान; भर पावसात प्रविण माने यांनी केली पुरग्रस्त भागातील पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : काल रविवार दिनांक २५ मे रोजी इंदापूर तालुक्यात झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने सर्वत्र प्रचंड नुकसान झाल्याची परिस्थिती आहे. मे महिन्याच्या अखेरीस आपल्या परिसरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस कधी होत नसल्याने, अवकाळी ओढवलेल्या या परिस्थितीने शेतकरी बांधवांचे व नागरिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. ढगफुटीसदृश पावसाने, नीरा नदीच्या पाणी पातळीतदेखील अचानक वाढ होऊन, नदीच्या काठावरील गावांतून पूर सदृश परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे एकीकडे ढगफुटीसारखा पाऊस व त्यावर नीरा नदीच्या पुराने नागरिकांची चांगलीच दैना झाल्याची परिस्थिती पहावयास मि



ळत आहे.

इंदापूर तालुक्यातील शेटफळगढे, भिगवण, मदनवाडी, भिगवण स्टेशन, सणसर, जांब, कुरवली, चिखली, उद्धट, लाकडी, निंबोडी आदी गावांसह नीरा नदी काठची गावे हि विशेष बाधित झाल्याची परिस्थिती आहे. या परिसरातील नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने येथील कुटुंबांचे मोठे नुकसान झाले आहे.

नागरीवस्तीप्रमाणे दुसरा सर्वांत जास्त बाधित घटक म्हणजे शेती असून, कालच्या ढगफुटीसदृश अवकाळी पावसाने डाळिंब, द्राक्षे, पेरू, केळी या फळबागांचे तसेच मका, कांदा, भुईमुग, चारा पिकांसह शेतातील इतर सर्व पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पाण्याचा लोंढा प्रचंड असल्याने शेतीतील माती वाहून गेली असून, काही प्रमाणात पशुधनाचेही नुकसान झाले असल्याचे निर्दर्शनास आले.

इंदापूर विभाग हा तसा कमी पावसाचा प्रदेश परंतु कालच्या ढगफुटीसदृश पावसाने छोट्या छोट्या ओढ्यांना अक्षरशः नदीचे स्वरूप प्राप्त झाल्याची परिस्थिती झाली होती. यातून शिकवण घेऊन तालुक्यातील नागरिकांना आगामी पावसाळ्यात सावधतेने राहणे अतिशय गरजेचे होणार आहे. तसेच तालुक्यात अद्याप काही ठिकाणी रस्त्यांची अवस्था अतिशय गंभीर असून येत्या पावसाळ्यात हि परिस्थिती अतिशय हालाकीची होण्याची परिस्थिती आहे, यामुळे पावसाने उघडीप दिल्यावर या रस्त्यांची कामेही गुणावत्तापूर्वक पद्धतीने व्हायला हवी.

या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रविण माने यांनी अवकाळी पाऊसाने बाधित गावांना भेट देत पाहणी केली. शेती पिके, फळबागा, घरे, व मालमत्ता यांचे कृषी, महसूल, ग्रामविकास खात्याने तातडीने पंचनामे पूर्ण करून, कुठल्याही शेतकरी बांधवावर अन्याय होणार नाही या पद्धतीने काम करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना माने यांनी दिल्या. याचसह कालच्या पावसाने रस्ते व पुल यांचेही अतोनात नुकसान झाले आहे, त्याचीही तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी यावेळी प्रशासनाकडे करण्यात आली

**इंदापूर तालुक्यातील बहुतांश गावांवर ओढवलेली परिस्थिती हि अतिशय भयंकर असून, नदी किनाऱ्यावरील स्थलांतरीत नागरिकांसह, शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई मिळवून देवून त्यांचे अश्रू प्रशासनाने तातडीने पुसावेत हीच माझी प्रमुख मागणी असून, यासाठी मी जातीने पाठपुरावा करणार आहे.**

असून, शासनाच्या माध्यमातून नागरिकांना तातडीने मदत मिळण्याकरता आपण स्वतः जातीने लक्ष घालणार असल्याचा शब्द माने यांनी नागरिकांना दिला.

या पाहणी दौऱ्यात कृषि उत्पन्न बाजार समितीचे मा.सभापती मयूरसिंह पाटील, शेटफळगढे गावचे सरपंच शंकर राऊत, अमोल साळुंखे, अमोल झगडे, संदीप मचाले, माऊली भोसले, रोहित कदम, अनिल घोरपडे, अशोक जगताप, शिवाजी मचाले, अविनाश मचाले, दिपक वाबळे, सतीश मचाले, अमोल मचाले, आदित्य हिडगे, अमोल मचाले, किरण खोचरे, पंढरीनाथ कदम, पंडित जोशी, तलाठी गर्जे भाऊसाहेब, ग्राम सेवक अशोक कदम आदी उपस्थित होते.

## थोडक्यात...



### राष्ट्रीय खाद्यतेल, तेलबिया अभियानांतर्गत निश्चित बियाणे वितरण करत आहे डीबीटी लोकशाही अर्ज महामंडळ विनंती

सोलापूर (जिमाका) : राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया या नवीन अभियानाला दिली आहे. समूहावर आधारित कार्यक्रम राब विराजमान आहे. अभियान सदरांतर्गत सोयाबीन, करडई, सुर्यफुल या पिकांसाठी सोलापूर निवडणूकीची निवड करण्यात आली आहे. सोयाबिन सुर्यफुल पिकाचे अचूक बियाणे तसेच रब्बी पिकाचे पिकाचे बियाणे १०० टक्के बँका वर अतिरिक्त वितरीत करण्यात आले आहे. पार्टी ०.२० हे ते संख्या जास्त १ हेक्टर मर्यादित बियाणे विधान वापरून उपलब्ध आहे. या करीता निवडी महाडीटीवर केलेल्या निवडणुकीत उमेदवारी अर्जुनी लाभार्थी लाभार्थी आहे. सरळ वर बाबु टाईल्स उपलब्ध करून देणार आहेत.

तरीदेखील ग्राहक महसुल, अनुसुचीत जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील सर्व सहभागी सदस्यांचा समावेश आहे, लाभ अधिकाधिक लाभार्थींनी महाडीबीटीवर https://mahadbtmahait.gov.in शेतकरी लॉगिन या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अधिक नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिकारी कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

## महामार्गालगतच्या पडघा आठवडा बाजाराला विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघा येथे मुंबई-नाशिक महामार्गालगत आठवडा बाजाराला सद्या विरोध होत असून त्यावर कोणतीच उपाययोजना केली जात नसल्यामुळे स्थानिक नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

महामार्गावर आठवडा बाजाराची बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. या बातमीची दखल घेत पडघा ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र विशे, कमिटी व कर्मचाऱ्यांनी मैदानात उतरून प्रत्यक्ष जागेवर जाऊन

**ग्रामपंचायतीने कारवाई केली नसल्याने नागरिकांचा संताप**

पाहणी केली. त्यानंतर महामार्गालगत बाजार महामार्गावरील आठवडा बाजारातील दुकानदारांवर कारवाई करण्यात आली.

भरवणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करत त्यांना महामार्गापासून, चार फूट मागे दुकाने घ्यायला लावली. तसेच वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या प्रवासी वाहतूक रिक्षा व खासगी वाहने हटवण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, चिंवीपाडा, शेरेकरपाडा, गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आठवडा बाजार जैसे थे भरल्याने आणि बाजारासाठी आलेल्या नागरिकांनी तिथेच गाड्या पार्किंग करूनही त्यांच्यावर ग्राम पंचायतीने काहीच कारवाई केली नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला.



महामार्ग लगत बाजार हा ग्रामपंचायत भरू देतच नाही. त्या ठिकाणी बसू नये म्हणून ग्रामपंचायतीने बॅनर्स लावले आहेत. ग्रामपंचायतच्या वतीने कर्मचारी देखील त्या ठिकाणी पाठवतो. व्यावसायिकांनी हायवे लागत बसू नये तर पडघा मार्केटमध्ये येऊन बसावं असं देखील आम्ही त्यांना सूचना देतो. हायवे लगत बसणाऱ्या व्यवसायिकांकडून कोणत्या प्रकारची कर पावती ग्रामपंचायत फाडत नाही. तरी येणाऱ्या रविवारी पोलीस बंदोबस्त राहील असे नियोजन करीत आहोत. असे पडघा ग्रामपंचायत अधिकारी भास्कर घुडे यांनी बोलताना सांगितले.

## राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षातर्फे नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी

राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधिमंडळ गटनेते आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड साहेब तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास भाई देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव रमझान शेख यांनी स्पंदन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल खारघर सोबत मिलून खारघर तलोजा फेज १ येथे नागरिकांच्या सुलभ आरोग्यासाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित केले होते.



राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाने सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून नागरिकांच्या आरोग्याच्या हितासाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे सामान्य जनतेपर्यंत दर्जेदार वैद्यकीय सेवा पोहोचवणे आणि आरोग्याबाबत जनजागृती करणे.

शिबिरामध्ये विविध तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती होती. सर्वसामान्यांसाठी रक्तदाब, रक्तातील साखर, हृदयविकार, दातांची तपासणी, डोळ्यांची तपासणी, फुफ्फुस तपासणी यासारख्या अनेक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

या उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि शिबिराचे विशेष कौतुक केले.याप्रसंगी ठाणे जिल्हा प्रशासन सरचिटणीस राजेश साटम, ठाणे शहर विधानसभा सोशल मीडिया अध्यक्ष राहुल पाटील, जयेश पाटील यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## देऊळगाव घुबे ग्रामपंचायतीसमोर युवक ऋषी भोपळे यांचे ठाम आंदोलन यशस्वी

**ग्रामसेवक ननकर यांनी दिल्या मागण्यांच्या पूर्ततेची हमी!**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील देऊळगाव घुबे गावामधील तरुण कार्यकर्ता ऋषी भोपळे यांनी गावाच्या समस्या आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मोठा पुढाकार घेतला. दिनांक १९ मे २०२५ रोजी त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाच्या दरवाज्यावर निवेदन चिटकवून विविध मागण्या मांडल्या होत्या. या मागण्यांमध्ये घरकुल योजनेची यादी मिळावी, १५व्या वित्त आयोगाच्या निधीची माहिती मिळावी, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करावा, पावसाळ्यापूर्वी नाली-गटारे स्वच्छ करावीत, अशा अनेक महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता.



पुढे २८ मे २०२५ रोजी त्यांनी गावातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. या इशाऱ्यामुळे ग्राम पंचायत प्रशासन खडबडून जागे झाले आणि आज दिनांक २६ मे २०२५ रोजी ग्रामसेवक ननकर साहेब यांनी स्वतः पुढाकार घेत काही मागण्या मान्य केल्या असून उर्वरित मागण्यांवर ८-१० दिवसांत कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले.

या सकारात्मक प्रतिसादामुळे ऋषी भोपळे यांनी आंदोलन स्थगित केल्याचे जाहीर केले आहे.

**घरकुल योजना पूर्णत्वाकडे...**

ग्रामसेवक ननकर साहेब यांनी माहिती दिली की, घरकुल योजनेत अडथळा आलेली कामे लवकर सुरू होतील व सुरू असलेली घरकुले पूर्णत्वास नेण्यात येतील. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

**पाण्याचा प्रश्नही मार्गी लागणार**

गावामध्ये गेल्या काही काळात पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवत होता. या पार्श्वभूमीवर ग्रामसेवकांनी चार ते पाच दिवसांत नियमित पाणी पुरवठा सुरू होईल, असा शब्द दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

**गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढे येणाऱ्या युवकांचे कौतुक**

ऋषी भोपळे यांच्यासारख्या जागरूक युवकांमुळे गावातील प्रशासन सतर्क होत असून गावाचा विकास योग्य दिशेने होताना दिसत आहे. सरपंच सौ. मालता गणेश जोहरे यांनी देखील सांगितले की, गावात पायाभूत सुविधा आणि गरजेच्या सेवा वेळेत देण्यासाठी ग्रामपंचायत कटिबद्ध आहे.

**नाली-गटारे स्वच्छतेचे कामही लवकरच सुरू**

पावसाळ्यापूर्वी गावातील नाली व गटारांची सफाई करणे अत्यंत गरजेचे आहे. यावरही ग्रामपंचायतीकडून त्वरित कारवाई होईल असे सांगण्यात आले आहे.

**दगडी पुलावर ३५ ते ४० हजार क्युसेसने वाहत आहे पाणी**

## मान्सूनपूर्व पाऊसः नगरपालिका आणि पोलिस प्रशासन यंत्रणा सज्ज






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : नीरा व भीमा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने सध्या दगडी पुलावर ३५ ते ४० हजार क्युसेस ने पाणी वाहत असून भाविक नदीपात्रात आंघोळीसाठी उतरून जीवितास धोका होऊ नये म्हणून नदीकडेला बॅरिकेटिंग करण्यात आले आहे. भाविकांनाही खोल पाण्यात अंघोळीसाठी जाऊ नये म्हणून आव्हान करण्यात येत आहे यासाठी प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर नगरपरिषदेची यंत्रणा व पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे तसेच नगरपालिकेची अग्निशमन दल जवान बोट घेऊन दगडी पुलाजवळ व नदीपात्रात बोटी द्वारे गस्त घालत आहेत.

यावेळी पंढरपूर नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी अँड. सुनील वाळुजकर, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता हरसुरे, अग्निशमन अधिकारी संभाजी कार्ले,आरोग्य अधिकारी तोडकर, अग्निशमन दल यंत्रणा व पोलिस यंत्रणा कामाला लागली आहे.

तसेच लगतच्या असलेल्या व्यास नारायण झोपडपट्टी व अंबाबाई पटांगण झोपडपट्टी येथील नागरिकांना सतर्क राहण्याबाबत स्पीकरद्वारेही सूचना देण्यात आलेले आहेत.